# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.04.2024** **वारःबुधवार**

---

1. राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचाराला आणि दुसऱ्या टप्प्यातील अर्ज प्रक्रियेला वेग
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 10 एप्रिलला राज्यात भाजपाच्या प्रचारमोहिमेचा नारळ फोडणार
3. लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीकडून पाच उमेदवारांची यादी जाहीर; पुण्यातून वसंत मोरे यांच्या नावाची घोषणा आणि
4. 19 एप्रिल ते 1 जूनदरम्यान निवडणुकीच्या कलचाचण्यांचे निकाल जाहीर करण्यास निवडणूक आयोगाची बंदी

**<u>मोदीसभा- मुंबई</u>**

राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचाराला आणि दुसऱ्या टप्प्यातील अर्ज प्रक्रियेला आता वेग येत आहे. पंतप्रधान आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची 10 एप्रिल रोजी रामटेक इथं आणि 14 एप्रिल रोजी चंद्रपूरला जाहीर सभा होणार आहे. 14 तारखेला नागपूर मधील दीक्षाभूमी इथं दर्शन घेऊन पंतप्रधान चंद्रपूरला रवाना होतील. त्यानंतरच्या काळात भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याही प्रचारसभा होणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आमदार प्रवीण दरेकर यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.

**<u>प्रचार-निवडणूक-नागपूर</u>**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची लोकसंवाद यात्रा नागपुरात सुरू आहे; काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या यात्रेत सहभागी झाले होते. तर, महाविकास आघाडीचे उमेदवार विकास ठाकरे यांनी नागपूर पश्चिममधून काल प्रचार यात्रा काढली. चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूरमध्ये प्रचारसभा घेतली. तसंच त्यांनी राष्ट्रीय ओबीसी, एससी, एस.टी, क्रांतीदलाच्या वतीनं आयोजित ओबीसी, आदिवासी, भटक्या विमुक्त जाती बांधवांच्या मेळाव्यातही सहभाग घेतला.

**<u>मेळावा-अहमदनगर</u>**

अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार सुजय विखे आणि माजी मंत्री राम शिंदे यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून मतभेद होते. काल प्रथमच या दोघांच्या उपस्थितीत जामखेड इथं कार्यकर्ता मेळावा घेण्यात आला.

**<u>वंचित उमेदवार</u>**

वंचित बहुजन आघाडीनं लोकसभा निवडणुकीसाठी काल पाच उमेदवारांची यादी जाहीर केली. यात पुण्यातून वसंत मोरे यांना, शिरुरमधून मंगलदास बागुल, औरंगाबादमधून अफसर खान, परभणीमधून बाबासाहेब उगले तर नांदेडमधून अविनाश बोसिकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान बारामतीमध्ये कोणीही उमेदवार न लढवता ‘राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार’ पक्षाच्या सुप्रिया सुळे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय, वंचित आघाडीनं काल जाहीर केला.

**<u>उमेदवारी अर्ज</u>**

दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी राज्यातील विविध मतदारसंघांमध्ये काल अनेक उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. **वर्धा** लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'शरदचंद्र पवार' गटाचे अमर काळे यांनी महाविकास आघाडीकडून काल

उमेदवारी अर्ज दाखल केला. स्वाध्याय मंदिरापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत त्यांनी रॅली काढली. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी या रॅलीपूर्वी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. **परभणी** लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विद्यमान खासदार संजय जाधव यांनी महाविकास आघाडीकडून काल अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेश टोपे यावेळी उपस्थित होते. त्यापूर्वी त्यांनी शनिवार बाजार ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी रॅली काढली होती. परभणी लोकसभा मतदार संघासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्यासह आणखी तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याची माहिती जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिली. **नांदेड** लोकसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान खासदार प्रतापराव पाटील-चिखलीकर यांनीही काल उमेदवारी अर्ज दाखल केला. नांदेड लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत 11 अर्ज दाखल झाले आहेत. **बुलढाणा** लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे प्रतापराव जाधव यांनी महायुतीकडून काल उमेदवारी अर्ज भरला. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यावेळी उपस्थित होते. **यवतमाळ - वाशिम** लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देशमुख यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. आमदार आदित्य ठाकरे आणि रोहीत पवार यावेळी उपस्थित होते. यावेळी झालेल्या प्रचार सभेत आदित्य ठाकरे यांनी युती सरकारवर जोरदार टीका केली.

**<u>एक्झिट पोल बंदी</u>**

आगामी निवडणूक कालावधीत निवडणूक अंदाज किंवा कलचाचण्यांचे अहवाल दर्शवण्यावर निवडणूक आयोगानं बंदी घातली आहे. राज्यात पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होणार असून 16 मार्चपासूनच आचारसंहिता लागू झाली आहे. राज्यात 19 एप्रिल रोजी सकाळी सात वाजल्यापासून 1 जून रोजी संध्याकाळी साडे सहा वाजेपर्यंतच्या कालावधीत कलचाचण्यांसाठी प्रतिबंध लागू राहणार आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यातील मतदान संपण्याच्या आधी, 48 तासांच्या कालावधीत ओपिनियन पोल अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असं निवडणूक आयोगाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

**<u>निरीक्षक नियुक्ती</u>**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगानं विविध राज्यात विशेष निरिक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात, निवृत्त आयएएस अधिकारी धर्मेंद्र एस. गंगावार यांची 'विशेष सर्वसाधारण निरीक्षक' म्हणून तर निवृत्त आयपीएस अधिकारी एन.के. मिश्रा यांची 'विशेष पोलिस निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**<u>बैठक-बीड</u>**

बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटरच्या कार्यालयामध्ये, बीड लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. यावेळी निवडणुकीच्या काळात वेब कास्टिंग आणि लाईव्ह टेलिकास्ट संदर्भातील यंत्रणा सुसज्ज असावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

**<u>शिमग्याचे वाद-रत्नागिरी</u>**

शिमगोत्सवातल्या पालखीवरून रत्नागिरी जिल्ह्यातल्या 28 गावांमध्ये असलेले वाद मिटवण्यात पोलिसांना यश आलं आहे. ऐकुया त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**शिमगा अर्थात होळी हा रत्नागिरी जिल्ह्यातला अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण सण. ग्रामदैवतांच्या पालख्या नाचवण्यापासून त्या घरोघरी नेण्यापर्यंतच्या अनेक परंपरांसह हा सण अत्यंत उत्साहात आणि एकोप्याने गावोगावी साजरा होतो, मात्र जिल्ह्यातल्या 34 गावांमध्ये शिमगोत्सवातल्या पालखीवरून अनेक वर्षांपासून वादविवाद सुरू होते. ते वाद मिटवण्यासाठी यंदा रत्नागिरी जिल्हा पोलिसांनी पुढाकार घेतला. 28 गावांमधले वाद सामोपचाराने मिटवण्यात त्यांना यश आलं आहे. गावांमध्ये, तसंच पोलीस ठाण्यात ग्रामस्थांच्या वारंवार बैठका घेऊन, सुसंवाद साधून वाद मिटवण्यात आले. उर्वरित सहा गावांमध्ये कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मनाई आदेश लागू करण्यात आले. जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस दलाने हे कार्य केलं.**

**त्यात त्यांना त्या त्या गावचे पोलीस पाटील, शांतता समिती सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, तंटामुक्ती समित्या आणि शिमगोत्सव मंडळांचं सहकार्य लाभलं. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**विमानसेवा-कोल्हापूर**

कोल्हापूर विमानतळावरील नवं टर्मिनल गेल्या शुक्रवारी प्रवाशांसाठी खुलं करण्यात आलं असून, कोल्हापूर ते तिरुपती बालाजी विमानसेवा परवा, सोमवारी सुरू झाली. यामुळे प्रवाश्यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. सध्या कोल्हापूर विमानतळावरुन कोल्हापूर - बेंगळुरु आणि कोल्हापूर - हैद्राबाद सेवा सुरू आहे. आता आठवड्यातून तीन दिवस कोल्हापूर तिरुपती विमानसेवाही सुरू झाली आहे, अशी माहिती विमानतळ संचालक अनिल शिंदे यांनी दिली.

**मतदान जनजागृती**

राज्यात एकीकडे लोकसभा निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली असली तरी प्रशासनाच्या वतीनं मतदार जनजागृती मोहिमाही सुरु आहेत. नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी काल तीनशे नवमतदारांशी संवाद साधत त्यांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

**अपघात-सांगली**

सांगली जिल्ह्याच्या कवठेमहांकाळ तालुक्यात काल झालेल्या अपघातात चार ऊसतोडणी कामगारांचा मृत्यू झाला असून 10 जण जखमी झाले. रत्नागिरी - नागपूर महामार्गावर आगळगाव फाटा इथं ऊसतोड कामगार असलेल्या ट्रॅक्टरला भरधाव टेम्पोनं पाठीमागून धडक दिल्यानं हा अपघात झाला.

**चकमक**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात काल सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत 9 नक्षलवादी ठार झाले आहेत. केंद्रीय राखीव दल, कोबरा बटालियन आणि जिल्हा राखीव पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. बिजापूर जिल्ह्याच्या बस्तर विभागातील गंगापूर भागात ही कारवाई करण्यात आली. चकमकीनंतर पोलिसांना 4 नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून एक हलकी मशीनगन, ग्रॅनेड लाँचर आणि इतर शस्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

**आवाहन-सोलापूर**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात तापमानाचा पारा सातत्यानं वाढत आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक 42 अंश तपमानाची नोंद सोलापुरात काल झाली. त्यामुळे उष्माघाताची शक्यता असल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असं आवाहन जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीनं डॉ. संतोष नवले यांनी केलं आहे.

**हवामान**

राज्यात काल सर्वाधिक 42 अंश सेल्सियस तापमान मालेगाव इथं नोंदवण्यात आलं. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज आकाश ढगाळ राहील. पाच एप्रिलपासून राज्याच्या काही भागांमध्ये हलक्या पावसाची शक्यता आहे. आज संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरील प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.